**मे. अल्ट्राटेक सिमेंट लि., युनिट माणिकगड सिमेंट वर्क्स, पो. गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर यांच्या जिवती तालुक्यातील मरकागोंदी गावातील प्रस्तावित ५४.२५ हे.आर. खाण लीज क्षेत्रात ७,००,००० टन/वर्ष उत्पादन क्षमतेच्या मारकागोंदी लॅटेराईट खाण प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १६/०२/२०२४ |
| वेळ | : | सकाळी ११:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ, गाव- मारकागोंदी, ता. जिवती, जि. चंद्रपूर. |

**<u>प्रस्तावना:-</u>**

मे. अल्ट्राटेक सिमेंट लि., युनिट माणिकगड सिमेंट वर्क्स, पो. गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर यांनी त्यांच्या प्रस्तावित ५४.२५ हे.आर. खाण लीज क्षेत्रात ७,००,००० टन/वर्ष उत्पादन क्षमतेच्या मारकागोंदी लॅटेराईट खाण प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र या प्रकल्पाच्या उभारणीच्या पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणी बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या राज्य पर्यावरण मुल्यांकन -१ समितीच्या दि. २५/०७/२०२२ ते २७/०७/२०२२ दरम्यान पार पडलेल्या २२६ व्या बैठकीत व राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यमापन प्राधिकरणाच्या दि. २१/१०/२०२२ रोजी आयोजित २५२ व्या बैठकीमध्ये टीओआर (TOR) ला मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग बी-१ मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावऱण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. अल्ट्राटेक सिमेंट लि., युनिट माणिकगड सिमेंट वर्क्स, पो. गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर, महाराष्ट्र यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक १४/०६/२०२३ अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक १३/०१/२०२४ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, व्ही.सी.ए. समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
४. प्रादेशिक कार्यालय/ उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय कार्यालय, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
९. तहसिल कार्यालय, जिवती, ता. जिवती, जि. चंद्रपूर.
१०. नगर पंचायत कार्यालय, जिवती, ता. जिवती, जि. चंद्रपूर.
११. गट-ग्रामपंचायत कार्यालय, मारकागोंदी (मारकागोंदी, पल्लेझरी, माथाडी, गोंडगुडा), ता. जिवती, जि. चंद्रपूर.
१२. ग्राम पंचायत कार्यालय, अंबेझरी, ता. जिवती, जि. चंद्रपूर.
१३. ग्राम पंचायत कार्यालय, नंदप्पा (नंदप्पा-बेलगाव), ता. जिवती, जि. चंद्रपूर.
१४. ग्राम पंचायत कार्यालय, पिटीगुडा नं.१, ता. जिवती, जि. चंद्रपूर.
१५. ग्राम पंचायत कार्यालय, मारकागोंदी(घाटराईगुडा), ता. जिवती, जि. चंद्रपूर.

१६. ग्राम पंचायत कार्यालय शेनगाव, ता. जिवती, जि. चंद्रपूर.
१७. ग्राम पंचायत कार्यालय, मारकागोंदी(सलीम नगर), ता. जिवती, जि. चंद्रपूर.
१८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ:- www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते १८ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्पा स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-११२/२०२४ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (ड्बल्युपीसी) पीएच/बी-२४०१२५-एफटीएस-०००४ दिनांक २५/०१/२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत ०३ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री. उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. संजय पवार, अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर, श्री. तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

यानंतर उपस्थित नागरीकांपैकी काही नागरीकांनी प्रश्न उपस्थित केले. ते खालीलप्रमाणे आहेत:-

**१) श्री. राजेश वा. बेले, संस्थापकीय अध्यक्ष, संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्था, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी पर्यावरण जनसुनावणी विरोधात तक्रार दाखल केली होती परंतु त्यावर जिल्हाधिकारी कार्यालय व म.प्र.नि. मंडळाकडून उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे माझा या जनसुनावणीला आक्षेप आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावण समिती यांनी सांगितले की, सादरीकरणानंतर सर्वांना बोलण्याची संधी देण्यात येईल आपल्या सूचनांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | जनसुनावणीच्या जाहीरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे आम्ही तक्रार दाखल करू शकतो. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची पडताळणी करण्यात आली आहे काय? पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल इंग्रजीत आहे कुणाला समतज नाही. मराठीत असायला पाहिजे. हवा गुणवत्ता खरी नाही. पाणी तपासणी केली नाही. वनक्षेत्र आहे. प्रदूषण वाढत आहे. जमीन देणार नाही. पर्यावरण समितीचा सभा झाली नाही. | पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची पडताळणी करण्याचे अधिकार पर्यावरण विभाग यांचेकडे आहे. म.प्र.नि. मंडळाचे काम पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करणे आहे.<br><br>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनीसांगितले की, उपस्थित सर्व प्रश्नांचे समर्पक उत्तर देण्यात येईल. जर कोणाचे समाधान नाही झाले ते त्याकरिता बाकीचे पर्याय उपलब्ध आहेत. सदर जनसुनावणीदरम्यान सर्वांचे म्हणणे ऐकले जाईल व त्यावर शासनातर्फे योग्य तो निर्णय घेण्यात येईल. पर्यावरण विषयक जनसुनावणी समितीला कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार नाही. |
| २) | सदर प्रकल्पाचे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल खोटा आहे. सदर अहवालाची पडताळणी करण्यात आलेली नाही. आम्ही सदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालावर आक्षेप घेतला होता. मा. जिल्हाधिकारी जिल्ह्याचे प्रथम नागरीक आहेत. आपणाकडून नागरीकांची दिशाभूल करणाऱ्या पत्रकावर उत्तर अपेक्षित होते. त्यामुळे सदर जनसुनावणी असंवैधानिक असल्याचे माझे मत आहे. जर एखादी व्यक्ती संवैधानिकरित्या तक्रार दाखल करत असेल तर त्या तक्रारीची शहानिषा करून तक्रारदाराचे समाधान करायला हवे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची पडताळणी करण्याचे काम जनसुनावणी समितीचे आहे. माझी तक्रार प्राप्त झाल्यानंतर आपण तक्रारीची पडताळणी करून सदर तकार खोटी किंवा खरी याची माहिती द्यायला हवी होती. भारताच्या संविधानानूसार पर्यावरण हा प्रत्येक भारतीय नागरीकाचा मूलभूत अधिकार आहे. चंद्रपूर जिल्हा संपण्याच्या दिशेने जात आहे. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. कृपया इतरांना बोलण्याची संधी द्यावी. आपणांस परत बोलण्याची संधी देण्यात येईल. |
| ३) | सदर जाहीरातीमध्ये तक्रार दाखल करण्याबाबत नमूद केलेले नाही. मी सन २०१० पासून पर्यावरणावर माझ्या | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची |

| | | |
|---|---|---|
| | संस्थेमार्फत काम करत आहे. यांच्या चुनखडी खाणीमुळे आधीच जल व वायु प्रदूषण होत आहे. सदर कंपनीला प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे वारंवार नोटीस देण्यात येते व बँक हमी जप्त करण्यात येते. तरीदेखील कंपनी खोटे अहवाल सादर करून जनसुनावणीचे प्रस्ताव सादर करतात व जनसुनावण्या घेतात. म्हणून सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी. त्याबाबत केंद्रीय मंत्रालयाकडून झाला असेल. जर ईमेल प्राप्त झाला नसेल तर पर्यावरण विषयक जनसुनावणी सुरू ठेवावी. | नोंद घेण्यात आली आहे. सर्वप्रथम प्रकल्प प्रवर्तकांना प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करू द्यावे व त्यानंतर सर्व शंकांचे प्रकल्प प्रवर्तकांकडून निराकरण करून घेण्यात येईल. सर्वांचे म्हणणे विचारात घेऊनच पुढचा निर्णय घेण्यात येईल. |

२) **<u>श्री. भुषण मधुकरराव भुसे, शांतीनगर, ता. जिवती, जि. चंद्रपूरः-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सर्वप्रथम ही जनसुनावणी संवैधानिक आहे किंवा कसे याची माहिती देण्यात यावी. सदर जनसुनावणी असंवैधानिक पद्धतीने घेण्यात येत आहे. ज्या तक्रारी करण्यात आल्या त्याचे उत्तर का देण्यात आल्या नाहीत? कोसंबीला वीज पाणी नाही. महसूल विभागात जमीनीची माहिती नाही. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. तथापी सदर बाब या प्रकल्पाशी संबंधित नाही. |

यानंतर समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्प व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,

- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

आयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

**१) श्री. भुषण मधुकरराव भुसे, शांतीनगर, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सर्वप्रथम तत्कालीन माणिकगड सिमेंट व आताची अल्ट्राटेक सिमेंट यांनी स्पष्टीकरण द्यावे की त्यांनी गडचांदूर येथील बंगाली कॅम्प वार्ड क्रं. ३ ची जी अवस्था केली आहे तशी अवस्था जिवतीची होणार नाही. याची शाश्वती कोण घेणार? बंगाली कॅम्प वार्ड क्रं. ३ ला या कंपनीने गेल्या ४० वर्षांपासून पाणी, वीज, रस्ते यासारख्या पायाभूत सविधांपासून वंचित ठेवले आहे. याबाबत मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर पासून मा. पंतप्रधानांपर्यंत तक्रारी करण्यात आल्या आहेत व वृत्तपत्रात बातम्या प्रकाशित करण्यात आल्या आहेत. कंपनीने कोसंबीच्या नागरीकांसोबत काय केले याची माहिती देण्यात यावी. सदर कंपनीने कोसंबी गावातील नागरीकांना पाण्यापासून व वीजे पासून वंचित ठेवले आहे. या देशातील नागरीकांना पायाभूत सुविधांपासून वंचित ठेवणाऱ्या उद्योगांवर विश्वास कसा ठेवायचा? माझ्या प्रशासनाला प्रश्न आहे की जर त्यांच्याकडे जिवती तालुक्यातील जमिनीचा रेकॉर्ड नाही त्यामुळे जिवती तालुक्यात जमिनीचा फेरफार करता येत नाही | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, बंगाली कॅम्पचे मुद्दे सदर प्रकल्पाशी संबंधित नाहीत. कंपनी परिसरातील पर्यावरणाची खाण प्रकल्प कार्यान्वित करताना काळजी घेईल. |

| | | |
|---|---|---|
| | तर प्रकल्प प्रवर्तक ५४ हेक्टर जमीन वनविभागाची आहे हे कशावरून सांगता? या कंपनीने गडचांदूर शहराचे प्रदूषण वाढविले आहे. रस्ते खराब करून अपघातांचे प्रमाण वाढविले आहे तसेच स्थानिक युवकांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढविले असून त्यांच्यावर अन्याय केला आहे. त्यामुळे या कंपनीला येथे एक इंचही जागा देणार नाही. वन विभागाशी कोर्टाच्या माध्यमातून लढा देण्यात येईल. | |

**२) श्री. राजेश वा. बेले, संस्थापक अध्यक्ष, संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्था, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मरकागोंदी लॅटेराईट खाण प्रकल्प, ता. जिवती, जि. चंद्रपूर यांनी जो पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल जनतेसमोर सादर केलेला आहे तो पूर्णत: खोटा आहे. म.प्र.नि. मंडळाचे प्रादेशिक अधिकारी यांना तक्रार देऊनही ते कोणतीही कार्यवाही करत नाहीत. कंपनीने दिलेल्या प्रस्तावनेमध्ये काहीच समजत नाही. मा. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय व सत्र न्यायालय प्रादेशिक भाषेत निकाल देत आहेत परंतु म.प्र.नि. मंडळ व जिल्हाधिकारी कार्यालय हे इंग्रजी भाषेत प्रकाशित झालेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाला मान्यता देत आहेत. स्थानिक ग्रामपंचायतीमधील रहिवाशांपैकी कोणालाच इंग्रजी भाषेचे ज्ञान नसल्याने वाचता येत नाही. जनतेची दिशाभूल करून पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल देण्यात येत आहे व जनतेची दिशाभूल करत आहेत. या ठिकाणी वायु व ध्वनी गुणवत्ता तपासण्यात आली आहे ती मागील वर्षी माणिकगड सिमेंट चुनखडी खाणीच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामधील मजकूर जशास तसा टाकण्यात आल्याचे दिसते. चंद्रपूर जिल्ह्यातील प्रत्येक प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये फक्त कॉपी पेस्ट केल्याचे दिसते. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल शासनाने प्रमाणित केलेल्या संस्थेकडून तयार करण्यात येतो. त्यामध्ये म.प्र.नि. मंडळ, उद्योग व इतर कोणीही हस्तक्षेप करत नाहीत. राष्ट्रीय शिक्षण आणि प्रशिक्षण मान्यता मंडळ (नाबेट) संस्थेद्वारे पर्यावरण सल्लागारांना पर्यावरण आघात मुल्यांकन करण्यासाठी प्रमाणित करण्यात येते. या संस्थेची तज्ञ मंडळी सर्व प्रकारच्या तपासण्या करतात. शासनाने दिलेल्या नियमावलीचे तंतोतंत पालन करूनच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यात येतो. राज्यस्तरीय पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या सत्यतेबाबत ठरविते. हा मसुदा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल आहे. अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल जनसुनावणीनंतर तयार करण्यात येईल व त्याचे मुल्यांकन राज्यस्तरीय पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरणाकडून करण्यात येईल. सदर प्राधिकरणामध्ये तज्ञ समिती असते ती या सर्व गोष्टींची पडताळणी करते. दोन |

| | | |
|---|---|---|
| | जिवती तालुक्यातील जल, वायु व ध्वनीची तपासणी करतेवेळी स्थानिक नागरीकांना अवगत केले नसल्याने यावर विश्वास कसा ठेवायचा? पर्यावरण जनसुनावणी जनतेच्या हितासाठी असते परंतु जर प्रशासनच खोट्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालावर विश्वास ठेवत असेल तर यापेक्षा मोठी शोकांतिका चंद्रपूर जिल्ह्याची नाही. वारंवार आमच्या जिल्ह्याचे प्रदूषण वाढत आहे व त्याचा नागरीकांच्या आरोग्याला व वन्य प्राण्यांना धोका निर्माण होत आहे. आव्हेरबर्डन कुठे टाकण्यात येईल? | टप्प्यांमध्ये प्रकलपाचे मुल्यांकन केले जाते. दोन्ही बैठकांमध्ये प्रस्ताव पारित झाल्यानंतरच पर्यावरणीय मंजूरी देण्यात येते. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल प्रकल्प प्रवर्तक स्वत: करत नाहीत. त्यासाठी वेगळी संस्था नेमण्यात येते. त्यामध्ये कोणाचाही हस्तक्षेप होत नाही. शासनाच्या सर्व नियमांचे पालन करूनच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यात येतो. सदर प्रकल्पामध्ये जमीनीतून बाहेर आलेल्या लॅटेराईट खनिजाचे फक्त उत्खनन करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रकल्पातून अधिभार ढिगारे निर्माण होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. |
| २) | वन कायद्यानुसार वनक्षेत्रामध्ये कुठल्याही प्रकारच्या उद्योगांना परवानगी देण्यात येत नाही. तरी देखील पर्यावरण जनसुनावणी होते कशी? या गावातील व जिल्ह्यातील लोकांना यातील काहीच कळत नाही. स्थानिक नागरीक फक्त रोजगार व जमीनीच्या मोबदल्यासाठीच येथे उपस्थित आहेत. वर्षानुवर्षे शेती करणाऱ्या जमीनी प्रदूषण करणाऱ्या उद्योगांच्या स्वाधीन कशा करायच्या जेव्हा त्यामुळे स्थानिक नागरीकांच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण होईल? जिल्ह्यातील नागरीकांचे आरोग्य जोपासणे हे जिल्हाधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी सपशेल दुर्लक्ष करतात. गावकऱ्यांची दिशाभूल झाल्यास याचा परिणाम अधिकाऱ्यांना भोगावा लागेल तसेच येथे उद्योग कसे चालतात ते ही आम्ही पाहू. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ३) | जल, वायु व ध्वनी चाचणी करताना पंचनामा केलेला नाही. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी सांगतात की सदर अहवाल नियमानूसार तयार करण्यात आलेला आहे. येथील जनसंख्या किमान २५००० इतकी असून जनसुनावणीकरिता फक्त १०० लोक हजर आहेत. मी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ व जिल्हाधिकारी यांना विनंती केली होती की शेजारच्या प्रत्येक गावामध्ये जनसुनावणीचे फलक | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. सदर जनसुनावणीबाबत दोन वृत्तपत्रांमध्ये जाहीराती प्रकाशित करण्यात आल्या होत्या. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशच्या प्रती जवळपासच्या १० ग्रामपंचायतींना देण्यात आल्या होत्या. तसेच संबंधित गावांमध्ये लाऊडस्पीकर द्वारे माहिती देण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | लावण्यात यावेत परंतु तसे झाले नाही. वन जमीनीचा मुद्दा असेल तर वन विभागाचे अधिकारी जनसुनावणीला उपस्थित का नाही? | |

**३) श्री. बालाजी शिवाजी जाधव, पल्लेझरी, ता. जिवती, जि.चंद्रपूरः**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे गाव प्रकल्पस्थळापासून जवळच आहे. प्रस्तावनेमध्ये असे लिहीले आहे की सन २०२२ मध्ये गामपंचायतीला पत्र पाठविण्यात आले. येथे प्रत्येक ४ महिन्यात ग्रामसेवकाची बदली करण्यात येते त्यामुळे ते पत्र आमच्या ग्रामीण स्तरावर एकालाही माहिती नाही. दि. २५/०१/२०२४ रोजीचे पत्र ३१/०१/२०२४ रोजीच्यामासिक सभेमध्ये प्राप्त झाले. त्यामध्ये वन जमीन वगळता बाकीच्या जमीनीसाठी ना-हरकत प्रमाणपत्राची गरज असल्याचे नमूद होते. तसेच जनसुनावणीचे पत्र मधातच कुठून व कसे आले हे समजलं नाही. आज जनसुनावणी असल्याचे आम्हाला गावात आल्यानंतर कळले. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, जनसुनावणीचा व्यापक प्रचार केला गेला. दोन दैनिकांमध्ये जाहीरात देण्यात आल्या होत्या. |
| २) | श्री. बेले व श्री. भुसे यांनी सांगितल्याप्रमाणे येथे जमीनीचे फेर फार बंद आहेत. याकरिता आमच्या गावात वन विभागाविरोधात उपोषण झाले. येथे पिढ्यान पिढ्या कास्तकारी सुरू आहे. त्यामुळे ही ५४ हेक्टर जमीन खरंच वन्य जमीन आहे काय? येथे जास्तीत जास्त जमीन कास्तकारी आहे. सन २०१६ मध्ये मोजणी सुरू असताना वन अधिकाऱ्यांना भेटलो असता त्यांनी आम्हाला सांगितले की आम्ही येथील रहिवासी नाहीत. प्रकल्पाला विरोध नाही परंतु गडचांदूर व कोसंबी सारखी परिस्थिती येथे निर्माण व्हायला नको. येथील शेतकऱ्यांचे भलं व्हायला पाहिजे. विकास व्हायला हवा, सुविधा मिळायला हव्या. स्थानिक नागरीकांना अंधारात ठेवून या सर्व गोष्टी घडतात ही सर्वात मोठी शोकांतिका आहे. | सुचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

४) **<u>श्री. रफीक निजामी, मरकागोंदी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माणिकगड सिमेंटचा मला चांगला अनुभव आहे. ते बोलतात एक आणि करतात एक. माणिकगड कंपनीचे प्रतिनिधींना विनंती आहे की त्यांनी मंचावर यावे व माझ्या प्रश्नांची उत्तरे द्यावी. मरकागोंदी येथील जमीन शासनाच्या नोंदीनूसार वन जमीन आहे परंतु येथे सन १९६२ पासून आजपावेतो तीसरी पिढी कास्तकारी करत आहे. मरकागोंदी परिसर व प्रकल्पग्रस्त शेतकरी येथे उपस्थित आहेत. शासनाच्या नोंदीनूसार येथील जमीन ही वन जमीन आहे. येथे सर्वांची इच्छा आहे की कंपनीने त्यांची जमीन अधिग्रहीत करावी. या प्रकल्पात ६५ लोकांना रोजगार मिळणार असल्याचे सांगण्यात आले परंतु यामध्ये स्थानिक लोकांना किती प्रमाणात रोजगार मिळणार याची माहिती देण्यात यावी. ६५ पैकी कुशल व अकुशल रोजगार किती लोकांना देणार | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर जमीन कंपनीने अद्यापपावेतो विकत घेतलेली नाही. फक्त लिलावामध्ये कंपनीने भाडेतत्त्वावर घेतली आहे. शासनाच्या नियमानूसार जमीन अधिग्रहीत करण्यात येईल. सदर प्रकल्प एक छोटा प्रकल्प आहे. जसे माणिकगड सिमेंट कंपनीमध्ये ८० ते ८५ टक्के स्थानिकांना रोजगार देण्यात आला आहे त्याचप्रमाणे येथे देखील स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार रोजगार देण्यात येईल. आम्ही कोणताही प्रतिनिधी नेमलेला नाही. शासकीय नियमानूसार जमीन अधिग्रहण करण्यात येईल. |
| २) | ग्रामपंचायत मरकागोंदी येथे आमसभा घेऊन सदर प्रकल्पास मंजूरी मिळाली काय? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर अहवाल हा फक्त मसुदा अहवाल आहे. केंद्र शासन व राज्य शासनाच्या नियमावलीनूसार सदर अहवाल तयार करण्यात येतो व त्यामध्ये जनसुनावणी घेऊन स्थानिकांचे मत नोंदविण्याची अट असते. शासनाच्या नियमानूसार गरज भासल्यास ग्रामपंचायतीकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात येईल. |
| ३) | येथे वातावरणीय हवेचे मोजमाप करण्यात आले व त्यामध्ये सद्य:स्थितीत हवेची गुणवत्ता कशी आहे हे दाखविण्यात आले. गडचांदूरला सिमेंट प्रकल्प येतेवेळी वातावरणीय हवा गुणवत्ता खराब न होण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परंतु सद्य:स्थितीत तेथील वातावरणीय हवा गुणवत्ता ही फार खराब आहे. आमहाला आशा होती की गडचांदूर येथील बेराजगारांना रोजगार मिळेल. कंपनीनूसार | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रकल्पामध्ये ७ लाख टन लॅटेराईटचे उत्पादन घेण्यात येणार आहे. लॅटेराईटमध्ये आर्द्रता असते. तथापी खाण परिसर व रस्त्यांवर पाणी फवारणी केली जाईल जेणेकरून खाणी लीज क्षेत्राबाहेर याचा विपरीत परिणाम होणार नाही. अत्याधुनिक यंत्रणांद्वारे मातीचे उत्खनन करण्यात येईल. पर्यावरण आघात मुल्यांकन |

| | | |
|---|---|---|
| | स्थानिकांना रोजगार मिळाला परंतु स्थानिकांच्या मते रोजगार मिळालाच नाही. स्थानिकांना विविध आजार जसे की श्वसनाचे आजार, डोळ्यांच्या आजाराने ग्रासले. आज देखील माणिकगड सिमेंटमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते व परिसरातील घरांवर धूळीचा थर साचलेला दिसून येतो. या ठिकाणी देखील तीच परिस्थिती उद्भवणार काय? तुम्ही टँकरने पाणी फवारणी करणार काय आणि पुढे देखील हवा गुणवत्ता चांगली राहणार काय? | अहवाल शासनाने प्रमाणित केलेल्या संस्थेकडून तयार करण्यात येतो. त्यामध्ये म.प्र.नि. मंडळ, उद्योग व इतर कोणीही हस्तक्षेप करत नाहीत. नाभेड संस्थेद्वारे पर्यावरण सल्लागारांना पर्यावरण आघात मुल्यांकन करण्यासाठी प्रमाणित करण्यात येते. या संस्थेची तज्ञ मंडळी सर्व प्रकारच्या तपासण्या करतात. शासनाने दिलेल्या नियमावलीचे तंतोतंत पालन करूनच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यात येतो. |
| ४) | जमीनीचा मोबदला थेट जमीन धारकांना देणार आहात किंवा दलालामार्फत जमीन खरेदी करणार आहात? कारण मागील २-३ महिन्यांपासून काही दलाल स्थानिक शेतकऱ्यांसोबत व्यव्हार करून जमीन खरेदी करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांचेकडून रू. ३.६० लाख प्रति एकर प्रमाणे जमीन खरेदी करून अल्ट्राटेक सिमेंट कंपनीला परस्पर विकण्याचे कटकारस्थान करत आहेत. तसेच त्या रकमेतून दलाली काढून स्थानिकांची दिशाभूल करत आहेत. कंपनी स्वत: जमीन खरेदी करून स्थानिकांना सोई सुविधा पुरविणार काय? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, शासनाच्या नियमानूसार जमीन खरेदी केली जाईल व मोबदला देण्यात येईल.<br><br>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आपसात बोलण्यास मनाई केली.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनी शासकीय नियमानूसार जमीन खरेदी करणार आहे. सदर बनवाबनवीचा प्रकार आपण शासनाच्या निदर्शनास आणून द्यावा. कंपनीने स्थानिकांकडून जमीन खरेदी करण्यासाठी कोणाचीही नेमणूक केलेली नाही. |
| ५) | चंद्रपूर, गडचांदूर येथील दलाल स्थानिक लोकांकडून जमीन खरेदी करून कंपनीला विकण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे स्थानिक नागरीकांचे नूकसानच होईल. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक मुद्यांबाबत आहे. पर्यावरण विषयक मंजूरी प्राप्त झाल्यानंतर जमीन अधिग्रहणाची प्रकिया सुरू करता येईल. त्याकरिता शासनाचे काही नियम आहेत, त्या नियमांचे पालन करूनच कंपनी जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू करणार. पर्यावरण विषयक काही मुद्दे असल्यास ते उपस्थित करावेत. |

५) <u>श्रीमती चंचल अमजद शेख, सलीमनगर, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ५४ हे. क्षेत्रामध्ये आमची २५ एकर जागा आहे. वन अधिकाऱ्यांकडून आमच्या शेतीची मोजमाप करण्यात आली. झाडांची मोजणी करण्यात आली. त्याबाबाबत विचारणा केली असता मोबदला मिळणार असल्याचे कारण सांगण्यात आले. त्यामुळे आमच्या मनात भिती निर्माण झाली व म्हणून आम्ही दलालाकडे आमची जमीन विक्री करण्यासाठी पाचारण केले. आम्हाला शासनाने जमीनीच्या मोबदल्याची हमी दिली तर आम्ही आमची जमीन कंपनीला विकण्यास तयार आहोत. स्थानिक नागरीकांमध्ये चर्चा आहे की वन विभागाने येथील जमीन कंपनला विकलेली आहे. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, वन विभागातर्फे करण्यात आलेली मोजणी ही त्या वेळेची शासकीय प्रक्रिया आहे. सर्वांनी येथे कंपनीची माहिती समजून घ्यावी. येथे कोणाचे समाधान न झाल्यास त्यांनी संबंधित विभागाकडे दाद मागावी/तक्रार नोंदवावी. |

६) <u>श्री. विक्रम येरणे, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सर्व प्रथम मुद्दा हो आहे की ज्यांनी सदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केलेला आहे ते पर्यावरण सल्लागार येथे उपस्थित आहे काय? जनसुनावणीला मान्यता मिळाल्यानंतर सर्व कागदोपत्री प्रक्रिया सुरू होते. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावर व इतर गोष्टी जसे की रोजगार, आरोग्यावर काय परिणाम होणार आहे हे कहते. या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये बऱ्याच चुका असल्याचे लक्षात येते. सदर अहवालामध्ये ५६/२ ची टोपोशीट दाखविण्यात आली व सांगण्यात आले की या क्षेत्रामध्ये वन जमीन असून एकही आरक्षित वन नाही. सदर नकाशामध्ये पूर्ण जागा आरक्षित वन क्षेत्र दाखविण्यात आले आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करताना कुठले संवेदनशील वन क्षेत्राबाबत विचारण्यात येते. त्यामध्ये राष्ट्रीय उद्यान किंवा अभयारण्य अस्तित्वात आहे काय? प्रकल्पाच्या १० किमी त्रिज्येमध्ये कोणतेही राष्ट्रीय उद्यान किंवा अभयारण्य अस्तित्वात नाही. तथापी प्रकल्पाच्या १० कि.मी. त्रिज्येमध्ये माणिकगडचे आरक्षित वन क्षेत्र अस्तित्वात आहे. |

| | | |
|---|---|---|
| २) | माणिकगड किंला हा १० कि.मी त्रिज्येमध्ये येते काय याची माहिती देण्यात आलेली नाही. तसेच जवळचे रेल्वे स्थानक विरूर दाखविण्यात आले आहे परंतु गडचांदूर येथे रेल्वे स्थानक अस्तित्वात आहे. तेथून माणिकगड सिमेंटची लोडींग व अनलोडींग सुरू असते. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, गडचांदूर येथे रेल्वे साईडींग अस्तित्वात आहे. सदर साईडींग फक्त कंपनीचा कच्च्या माल व तयार उत्पादनाच्या लोडींग व अनलोडींगकरिता वापरण्यात येते. तेथून सर्वसामान्य नागरीक ये-जा करत नाहीत. विरूर रेल्वे स्थानक सर्वसामान्यांच्या ये-जा करिता उपलब्ध आहे. त्यामुळे विरूर रेल्वे स्थानक पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमूद आहे. |
| ३) | येथे सांगण्यात आले की सदर जमीन ही वनजमीन आहे. कोणताही खाण प्रकल्प सुरू करताना तेथील पटवारी प्रस्तावित जमीनीची मौका पाहणी करतात व ५ मुद्यांचा अहवाल दिला जातो. त्यामध्ये जमीनीवर प्रत्यक्ष ताबा कोणाचा आहे याची नोंद करण्यात येते. त्याची यादी आम्हाला देण्यात यावी. आज आपण येथे पर्यावरणविषयक जनसुनावणी शासनाच्या प्रतिनिधींसमवेत घेत आहात तर आपणाकडे सद रयादी असायला हवी. सदर यादी जाहीर करणे सर्वात महत्त्वाचे आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ५४ हे. पट्टा आवंटीत आहेत त्याची यादी आहे. सदर यादी आपणांस एक आठवड्याच्या आत देण्यात येईल. |
| ४) | वन विभागाच्या नियमाप्रमाणे जर कंपनी १ एकर जागा अधिग्रहीत करत असेल तर त्याबदली २½ एकर जागा मोबदल्यात देणे बंधनकारक आहे. याबाबत स्थानिक रहिवाशांकरिता आपण काय उपाययोजना करणार आहात? किती झाडे कापणार? किती भरपाई करणार? | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, या ठिकाणी पर्यावरण विषयक मुद्दे मांडण्यात यावेत. इतर कोणतेही मुद्दे मांडण्यात येऊ नये. त्याकरिता वेगळी सुनावणी घेण्यात येईल. एकच मुद्दा परत परत उपस्थित करू नये. कंपनी प्रशासनाने सांगितलेले आहे की शासनाच्या नियमाप्रमाणे सर्व प्रक्रिया केली जाईल. सदर जनसुनावणी जमीन अधिग्रहणाबाबत नाही. या जनसुनावणीमध्ये कोणत्यही प्रकारचा निर्णय घेण्यात येज नाही. येथे फक्त जनतेचे प्रकल्पाविषयीचे मत नोंदविण्यात येते व ते शासनाकडे सादर केले जाते. त्यामुळे थोडक्यात म्हणणे मांडावे. |
| ५) | कंपनी प्रशासनाने स्पष्ट करायला हवे की ताबेदारालाच जमीनीचा थेट मोबदला देणार किंवा कसे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, शासनाच्या नियमांचे तंतोतंत पालन करूनच जमीनीचे अधिग्रहण केले जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कंपनी कोणत्याही जमीनधारकावर अन्याय करणार नाही. कंपनी सर्व नियमांना बांधिल आहे. तसेच शासनदेखील जनसामान्यांचे अधिकार हेरावून कोणावरही अन्याय करणार नाही. तरी कोणावर अन्याय झाल्यास त्याची दाद न्यायालयात मागण्याचा पर्याय उपलब्ध आहे तसेच इतर पर्यायही उपलब्ध आहेत. |
| ६) | माणिकगड सिमेंट कंपनीचा वार्षि नफा जवळपास रू. ५०० कोटी आहे. त्यानूसार CSR फंडातील २ टक्के रक्कम म्हणजेच एकूण रू. १० कोटी देखील कंपनी CSR अंतर्गत खर्च करत नाही. CSR अंतर्गत रू. ५.० लक्ष खर्च करून त्याचे रू. ५०.० लक्ष रूपये दाखविण्यात येतात. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, माणिकगड सिमेंट कंपनीने एकूण १ ते १.५ कोटी रूपये CSR/CER अंतर्गत खर्च केलेला आहे. त्या खर्चाचे देखील लेखापरिक्षण करण्यात येते. आपण रू. ५०० कोटी कोठे वाचले हे माहिती नाही. सिमेंट प्रकल्पालगत जवळपास २३ गावे आहेत. त्या गावांमध्ये CSR व CER अंतर्गत सोई सुविधा पूरविले जातात. तसेच कंपनी कायद्याचे पालन करणे कंपनीला बंधनकारक आहे. कंपनी कायद्यामध्ये नमूद केलेले काम CSR/CER अंतर्गत करण्यात येतात. त्यामध्ये पायाभूत सुविधांचा विकास, शाश्वत उपजिविका, आधुनिक आरोग्य सेवाइत्यादी कामांचा समावेश आहे. नजिकच्या काळात कंपनीने शिवणकेलेचे प्रशिक्षण दिले आहेत. गेल्या ३०-३५ वर्षांपासून स्थानिकांच्या सहकार्याने सुरू आहे. गावकऱ्यांच्या सहकार्याशिवाय कुठलाही प्रकल्प चालु शकत नाही. प्रस्तावित प्रकल्प फार छोटा आहे. पुढील ५ वर्षांकरिता ३५ लक्ष रूपये CSR अंतर्गत तरतूद करण्यात आली आहे व नवीन मार्गदर्शक तत्त्वानूसार रू. ४० लक्षची देखील तरतूद केलेली आहे. सादरीकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे रू. २.५८ कोटी रूपयांची अद्यावत प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | येणार आहे. वर्षाअखेरी रू. ५३ लक्षची वृक्ष लागवडीकरिता खर्च करण्यात येणार आहे. |
| ७) | ६५ रोजगाराची गरज प्रस्तावित प्रकल्पामध्ये आहे. आपण सांगत आहात की स्थानिकांना रोजगार देऊ. परंतु प्रत्यक्षात तसे होत नाही व याकरिता लोक आंदोलन करत आहेत. सदर प्रकल्पामध्ये किती वृक्षांची कत्तल होणार आहे व त्याची पर्यायी व्यवस्था कार्य आहे याची माहिती देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रकल्पामध्ये ३२५० झाडांची कत्तल करण्यात येईल व वन विभागांच्या नियमांप्रमाणे मोबदला देण्यातय येईल. |

**७) श्री. शरद सुरेशराव जोगी, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गडचांदूर शहरामध्ये माणिकगड सिमेंट कंपनीच्या प्रदूषणाचा खुप त्रास आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी नगर परिषदेच्या बैठकीमध्ये आश्वासन दिले होते की प्रदूषण कमी करण्यात येईल परंतु त्याची पूर्तता केलेली नाही. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर जनसुनावणी लॅटेराईट खाणीची आहे. येथे गडचांदूरचा या प्रकल्पासोबत कोणत्याही प्रकारे संबंध नाही. आपणांस विनंती आहे की प्रस्तावित खाण प्रकल्पाबाबत प्रश्न उपस्थित करावे. कंपनी प्रशासनाने एका वाक्यात गडचांदूर विषी स्पष्ट करावे.<br><br>प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, प्रस्तावित खाण प्रकल्प माणिकगड सिमेंट प्रकल्पापेक्षा खूप लहान आहे. माणिकगड सिमेंट कंपनीने अत्याधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविलेले आहेत. या उद्योगामध्ये सर्वात जास्त बॅग फिल्टर बसविलेले आहेत. प्रक्रियेमध्ये काही त्रुटी आल्यास प्रदूषणाचा त्रास होतो. त्यामध्ये वेळोवेळी योग्य त्या सुधारणा केल्या जातात. याबाबत वेळोवेळी संबंधित विभागांना माहिती देण्यात येते. |

८) **श्री. सय्यद शाहदूल, मरकागोंदी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्ही सन १९७१-७२ पासून शेती वाहत आहोत. माझी उपस्थितांना विनंती आहे की मरकागोंदीच्या विषयावर मुद्दे उपस्थित करण्यात यावे. येथे आमचे बरेच शतकरी उपस्थित आहेत. मे. अल्ट्राटेक कंपनी ५४ हे. जमीन घेणार असल्यास स्थानिकांना किती प्रमाणात रोजगार देण्यात येईल. जमीनीचा किती मोबदला देणार या विषयावर चर्चा करण्यात यावी. | प्रकल्प प्रर्वतकांनी सांगितले की, स्थानिकांना नौकरीत प्राधान्य देऊ. आपल्या सुचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

९) **श्री. गणेश उत्तम कदम, उप-सरपंच, ग्रामपंचायत नंदप्पा, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीचा प्रकल्प फार खंगला आहे. कंपनी प्रशासनाच्या नियमांचे पालन करूनच सर्व गोष्टी करणार आहे. स्थानिकांना प्रकल्पात रोजगार मिळाला पाहिजे. वायु जल व जमीनीचे प्रदूषण होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. रोजगार मिळाला तर स्थानिक लोकांचा विकास होईल. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. रस्त्याचे रूंदीकरण करून रस्त्याच्या दोन्ही कडेला झाडे लावण्यात यावी. कंपनीने आरोग्य शिबीरे घेतलेली आहेत. शेततळे बांधून दिले आहेत. जमीनी समतोल करून देण्याचे काम केले आहे. | सूचनांची नोंद घेण्यात आली आहे. |

१०) **श्री. शब्बीर मोईनुद्दीन सय्यद, तालुकाध्यक्ष, शेतकरी संघटना, शेनगांव, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनावणीबाबत आपण कोणाला अवगत केले याची माहिती द्यावी. फक्त वृत्तपत्रात जाहीरात | सूचनांची नोंद घेण्यात आली आहे. सदर जनसुनावणीबाबत दोन वृत्तपत्रांमध्ये जाहीराती |

| | | |
|---|---|---|
| | प्रकाशित करून काही अर्थ नाही कारण सर्वच नागरीक वृत्तपत्र वाचत नाहीत. ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी प्रस्तावित प्रकल्पामध्ये जाणार आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घ्यावे. उपस्थित प्रत्येक शेतकऱ्यांचे म्हणणे आपण ऐकले पाहिजे. आपण तालुक्यातील कोणत्याही पत्रकाराला जनसुनावणीबाबत माहिती दिलेली नाही. | प्रकाशित करण्यात आल्या होत्या. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशच्या प्रती जवळपासच्या १० ग्रामपंचायतींना देण्यात आल्या होत्या. तसेच संबंधित गावांमध्ये लाऊडस्पीकर द्वारे माहिती देण्यात आली आहे. |

११) **<u>श्री. शिरीष केंद्रे, अंबेझरी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर खाण प्रकल्प जिवती तालुक्यात येत आहे याचा आम्हाला आनंद आहे. सद्य:स्थितीत जिवती तालुक्यातील ७० ते ८० टक्के लोक जवळच्या तालुक्यात व राज्यात बाहेर कामाला जातात. जर येथे प्रकल्प आला आणि बाधित शेतकऱ्यांना रोजगार मिळाला तर स्थानिक लोकांचे जीवनमान ऊंचावणार व ते कंपनीच्या फायद्याचे ठरणार. कंपनी आणि प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी सर्वप्रथम प्रकल्पग्रस्त लोकांचे प्रस्तावित प्रकलपाविषयीचे मत ऐकूण घ्यावे. शासनाच्या महसूल विभागाने येथील जवळपास ७९०० लोकांना जमीनीच्या पट्ट्यांचे वाटप केले आहेत. येथील शेतकरी कृषी कर्ज घेतो व शेतीचे उत्पन्न करतो त्यामुळे तो या जमीनीचा मालक आहे. परंतु वन विभागाच्या चुकीच्या निर्णयामुळे जिवती तालुका वन घोषित करण्यात आला. वन विभागाच्या नियमानूसार आम्ही जंगलात राहतो परंतु महसूल विभागानूसार आम्ही येथील जमीनीचे मालक आहोत. माझी कंपनी व प्रशासनाला विनंती आहे की ५४ हे. क्षेत्रामध्ये शेती करणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याचा ज्याच्या ७/१२ असो किंवा नसो विचार करण्यात यावा. या ठिकाणी खाणकाम होईल त्यामुळे येथील पाण्याची पातळी खालावणार. जी आधीच कमी आहे. कंपनीने पाण्याच्या खालून उत्खनन केले तर येथील पिण्याच्या पाण्याची समस्या आणखी भीषण होईल. | सूचनांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीने हरीत पट्ट्यामध्ये वाढ करावी. प्रशासनाला इतकीच विनंती आहे की शेतकऱ्यांवर अन्याय करू नये. | |

## १२) श्री. निखील गोविंद पवार, अध्यक्ष, ग्रामविकास समिती, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पामुळे गावात रोजगार निर्मिती होईल. गावात रोजगार नसल्यामुळे स्थानिक गावकरी शेजारच्या राज्यात व तालुक्यात रोजगारासाठी जात आहेत. सदर प्रकल्पात किती बेरोजगारांना रोजगार मिळणार आहे याची माहिती द्यावी. तसेच सदर प्रकल्पातून होणाऱ्या नफ्याचा शासन किंवा कंपनी गावांच्या विकासासाठी कशा प्रकारे वापर करणार आहेत याची देखील माहिती देण्यात यावी. खाण उद्योग म्हटलं की अवजड वाहनांचा मुद्दा आलाच. त्याकरिता रस्त्याचा दर्जा वाढविण्याची गरज आहे. कारण गडचांदूर ते जिवती हा रस्ता मागील १५ वर्षांपासून अत्यंत खराब होता. मागील २ वर्षांत सदर रस्त्याचे दुरूस्तीचे काम करण्यात आले आहे परंतु रस्त्याची माल वाहून नेण्याची क्षमता वाढविण्याची गरज आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, स्थानिकांना ८० ते ८५ टक्के प्रमाणात रोजगारात त्यांच्या शैक्षणिक अर्हते नूसार प्राधान्य देण्यात येईल. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये वाहतूक व्यवथापनाबाबत नमूद आहे व शासनाच्या नियमांप्रमाणे वाहतूकीचे व्यवस्थापन केले जाईल. |
| २) | जिवती तालुक्याची गडचांदूर सारखी परिस्थिती होता कामा नये. तसेच आमचे आरोग्य आज जसे सुदृढ आहे तसेच पुढेदेखील रहायला पाहिजे. येथे फक्त उत्खनन होणार की उत्पादन देखील होणार आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रकल्पात लॅटेराईटचे फक्त उत्खनन करून सिमेंट कारखान्यापर्यंत वाहतूक करण्यात येईल. |
| ३) | खाण परिसरालगत असणाऱ्या शेतकऱ्यांना प्रदूषणमुळे नूकसान झाल्यास योग्य ती नूकसान भरपाई देण्यात येईल काय? जर जमीन अधिग्रहीत होणार असेल तर त्यांना त्याचा योग्य मोबदला देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाणकाम करताना खाणीतून होणारे धुलीकणांचे उत्सर्जन नियंत्रित करावयाचे असते व त्याबाबत प्रस्तावित उपाययोजनांबाबत सादरीकरणामध्ये सांगण्यात आले आहे. नियमित पाणी फवारणी करण्यात येईल. वृक्षारोपण करण्यात येईल तसेच वाहतूक करताना वाहनांची गती मर्यादित ठेवण्यात येईल. PUC असणाऱ्या वाहनांचाच वापर करण्यात येईल. पर्यावरण |

| | | |
|---|---|---|
| | | मंजूरी मिळाल्यानंतर परत परिसरातील वायु, जल व ध्वनी चाचणी शासन व कंपनीकडून करण्यात येते व त्याबाबतचा अहवाल नियमितपणे संबंधित विभागाकडे सादर करण्यात येतो. |
| ४) | आपण सांगितल्याप्रमाणे येथे जवळपास ३५०० झाडे तोडण्यात येतील. त्या ठिकाणी किती पटीने वृक्षारोपण करण्यात येईल? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, २.१९ हे. क्षेत्रामध्ये जवळापास ७५०० ते १०००० झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे. रस्त्याच्या दोन्ही कडेला झाडे लावण्यात येतील जेणेकरून रस्त्यालगच्या शेतीचे नूकसान होणार नाही. |
| ५) | ६५ रोजगार कोणत्या स्वरूपाचे असतील? शेजारच्या ग्रामपंचायतीतील, तालुक्यातील बेरोजगारांना रोजगार मिळेल किंवा कसे. स्थानिक बेरोजगारांना रोजगारात प्राधान्य देण्याची हमी देण्यात यावी. बाहेरच्या युवकांना रोजगार देण्यात येणार नाही याची देखील हमी देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, रोजगारात स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार प्राधान्य देण्यात येईल. |
| ६) | CSR फंडाचा गावाच्या विकासासाठी कशा प्रकारे खर्च केला जाईल याची माहिती थोडक्यात देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सिमेंट प्रकल्पालगत जवळपास २३ गावे आहेत. त्या गावांमध्ये CSR व CER अंतर्गत सोई सुविधा पूरविले जातात. तसेच कंपनी कायद्याचे पालन करणे कंपनीला बंधनकारक आहे. कंपनी कायद्यामध्ये नमूद केलेले काम CSR/CER अंतर्गत करण्यात येतात. त्यामध्ये पायाभूत सुविधांचा विकास, शाश्वत उपजिविका, आधुनिक आरोग्य सेवाइत्यादी कामांचा समावेश आहे. नजिकच्या काळात कंपनीने शिवणकेलेचे प्रशिक्षण दिले आहेत. गेल्या ३०-३५ वर्षांपासून स्थानिकांच्या सहकार्याने सुरू आहे. गावकऱ्यांच्या सहकार्याशिवाय कुठलाही प्रकल्प चालु शकत नाही. प्रस्तावित प्रकल्प फार छोटा आहे. पुढील ५ वर्षांकरिता ३५ लक्ष रूपये CSR अंतर्गत तरतूद करण्यात आली आहे व नवीन मार्गदर्शक तत्त्वानूसार रू. ४० लक्षची देखील तरतूद केलेली आहे. सादरीकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे रू. २.५८ कोटी रूपयांची अद्यावत प्रदूषण नियंत्रण |

| | | |
|---|---|---|
| | | सयंत्रणा बसविण्यात येणार आहे. वर्षाअखेरी रू. ५३ लक्षची वृक्ष लागवडीकरिता खर्च करण्यात येणार आहे. |
| ७) | सदर परिसरामध्ये पाणी टंचाईची समस्या फार भीषण आहे. परिसरातील गावांना जवळपास २-३ कि.मी. अंतरावरून पिण्याचे पाणी आणावे लागते. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाणकाम करताना पाण्याचा उपसा करण्यात येणार नाही. पहिल्या ५ वर्षांमध्ये जास्तीत जास्त ६ मीटर पर्यंत लॅटेराईचे उत्खनन करण्यात येईल. |
| ८) | मागील ७० वर्षांपासून या तालुक्यातील शेतकरी शेती करत आहे परंतु आजपावेतो त्यांना त्यांच्या हक्काचा ७/१२ मिळाला नाही. याबाबीची दखल शासनाने घेतली पाहिजे. कारण शासनाने जिवती तालुक्याला पूर्णत: वनजमीन घोषित केले आहे. तर शासनाने सदर प्रकल्पास मंजूरी दिलीच कशी? म्हणजेच शासनाला कुठेतरी काहीतरी करता येते. म्हणून शासनाने शेतकऱ्यांच्या ७/१२ वर भेगवटदार किंवा वर्ग-१ मध्ये नोंदणी करावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

**१३) श्री. व्यंकटी हर्गिले, चिखली पिट्टीगुडा, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| **अ. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | गडचांदूरमध्ये येथील स्थानिकांच्या जमीनी फसवणूक करून हस्तांतरीत करण्यात आल्या. आश्वासन देण्यात आले होते की दसऱ्या ठिकाणी जमीन उपलब्ध करून घरे बांधून देण्यात येईल. परंतु आजपर्यंत मिळाले नाही. शेतकऱ्यांच्या मागण्या सर्वप्रथम पूर्ण करण्यात याव्यात. जिवती तालुक्यातील बेरोजगारांनाच प्रकल्पात रोजगार देण्यात यावा. येथे कुशल कामगार उपलब्ध आहेत. जर मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर सदर प्रकल्प ठप्प करण्यात येईल. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले, याबाबत आमच्या कार्यालयात तक्रार नोंदवावी. |

१४) **श्री. साहेब अली मेहबुब अली, मरकागोंदी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी येथील शेतकरी आहे. माझी कंपनीला विनंती आहे की सर्वप्रथम जे शेतकरी १९६५-७० पासून येथे शेती करत आहे त्यांचा विचार करण्यात यावा. त्यांच्यासोबत थेट संपर्क करून त्यांच्या गरजा समजून घ्यावा व त्यांचे निराकरण करावे. त्यांच्या मुलांना उच्च शिक्षण, गावकऱ्यांना आरोग्य सुविधा देण्यात याव्यात. तसेच स्थानिक युवकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार रोजगार देण्यात यावा. ज्या स्थानिकांवी जमीन अधिग्रहीत करणार आहात त्यांना योग्य तो मोबदला देण्यात यावा. तसेच आमच्या गावाचा विकास झाला पाहिजे. | प्रकल्प प्रर्वतकांनी सांगितले की, सर्वांचा विचार करण्यात येईल. शैक्षणिक सुविधा CSR अंतर्गत पूरविण्यात येतील. स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार रोजगारात प्राधान्य दिले जाईल. |

१५) **श्री. बाळासाहेब सतवाजी माने, पल्लेझरी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | नियमाप्रमाणे ५ ते १० टक्के देखील काम होत नाही. मरकागोंदी ग्रामपंचायत हद्दीत हा ३रा प्रकल्प आहे. येथे आज जनसुनावणी असल्यामुळे पाणी फवारणी करण्यात आली आहे. येथे शेतकऱ्यांचे काय नूकसान होते, रोजगार कोणाला मिळतो हे देखील महत्त्वाचे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी याचे निरकरण करावे अन्यथा येथे पाणी फवारणी करण्यता येत नाही. रस्त्यालगत असणाऱ्या शेतीचे नूकसान झाले नाही पाहिजे. | सुचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

**१६) श्री. दत्ताजी रामचंद्र गायकवाड, माजी सरपंच, मरकागोंदी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे सन २००१ मध्ये मी सरपंच असताना जनसुनावणी झाली होती. सदर जनसुनावणीदरम्यान दिलेली आश्वासने आजपर्यंत पूर्ण झालेली नाहीत. रस्त्याच्या भारनियमन क्षमतेनूसार अवजड वाहनांची वाहतूक करण्यात यावी. आश्वासने दिली परंतु अंमलात आणली नाही. सर्व गोष्टी व्यवस्थित झाल्या पाहिजे. ग्रामपंचायतीला काय फायदा झाला याचे उत्तर जिल्हाधिकारी साहेबांनी द्यावे. प्रकल्प प्रवर्तक मोठी मोठी आश्वासने देतात परंतु त्याची पूर्तता होत नाही हे समजून घ्याला पाहिजे. शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनीचा मोबदला मिळालाच पाहिजे. १०० एकरावर उत्खनन झाले परंतु त्या ठिकाणी किती झाडे लावण्यात आली त्याची माहिती देण्यात यावी. वन जमीनीबाबत आम्ही शासनाकडून माहिती घेणारच आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात उत्खनन झाले त्यामुळे पाण्याची पातळी खालावली व शेतकरी ठार मेले. या तालुक्यातील जमीनीचे पट्टे द्यायला हवे होते. वन जमीन घोषित करून शासनाने शेतकऱ्यांवर अन्याय केला. जर कंपनीने शासनाच्या नियमाप्रमाणे शेतकऱ्यांना मोबदला दिला तर फार छान होईल. शेतकऱ्यांना त्यांचया जमीनीच्या बदल्यात नविन ठिकाणी जमीन देण्यात याव्या. माथडी येथे उत्खननाचा फायदा किती ग्रामपंचायतींना झाला याची माहिती देण्यात यावी. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, माथाडीच्या सर्व प्रश्नांचे उत्तर आपणांस जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे देण्यात येईल. त्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. गौण खनिज उत्खननाच्या माध्यमातून मिळणाऱ्या रॉयल्टी मधून ग्रामपंचायतीला काय सुविधा उपलब्ध होतील याची माहिती कंपनीने द्यावी. जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या नियमित बैठकी होत असतात व त्यामध्ये कोणत्या तालुक्याला किती निधी द्यायचा याचा निर्णय मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येतो. आपल्या गावात किती निधीची आवश्यकता आहे त्याबाबत आपण जिल्हाधिकारी कार्यालयाला कळवावे.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रकल्पातून ७.० लाख टन प्रतिवर्ष इतके उत्खनन करण्यात येईल व त्यामधून जिल्हा खनिज प्रतिष्ठान मध्ये रू. ७.० कोटींचा निधी शासनाच्या नियमाप्रमाणे जमा होईल. शासनाच्या नियमांप्रमाणे ग्रामपंचायतीमध्ये खाणीचा कर लागु असल्यास तो देखील अदा करण्यात येईल. तसेच १०० एकर मधील प्रकल्प हा मे. माणिकगड सिमेंट या कंपनीचा नाही. सदर प्रस्तावित खाण प्रकल्प हा मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड या कंपनीचा लॅटेराईट खाण प्रकल्प ५४.२५ हे. क्षेत्रामध्ये आहे. |

१७) **श्री. बाळा शेख, उप-सरपंच, मरकागोंदी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावालगत मे. रॉयल पॉटरी सिरॅमिक नावाची खाण आहे व त्यामधून शासनास रॉयल्टी मिळते. याबाबत वेळोवेळी शासनाकडे मागणी करून देखील रॉयल्टी मिळाली नाही. सदर प्रकल्पाची २ टक्के रक्कम CSR अंतर्गत थेट ग्रामपंचायतीला देण्यात यावी. सदर निधी कसा खर्च करायचा याबाबत ग्रामसभा घेऊन निर्णय घेण्यात येईल. ग्रामपंचायतीत रॉयल्टीची सरसकट २० टक्के रक्कम मिळायला हवी परंतु तसे होत नाही. प्रधानमंत्री खनिज विकास प्रतिष्ठान आल्यामुळे ही रक्कम कमी झालेली आहे. त्यामुळे आमचा विकास होत नाही. वर्ग-२ ची शेती विकता येत नाही. मात्र आपल्याच कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून सदर जमीन विकता येत असल्याचे पत्र प्राप्त झाले आहे. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे तसेच जमीनधारकांना योग्य तो मोबदला देण्यात यावा. वृक्षारोपण करण्यात यावे, नियमित पाणी फवारणी करण्यात यावी. मे. अल्ट्राटेक कंपनीला सदर ५४ हे. जमीनीचा पट्टा लिलावाद्वारे वाटप करण्यात आले. दि. ०४/०८/२०२३ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे १९९६ च्या पहिलेची जमीन वन जमीन घोषित करता येत नाही. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर जनसुनावणीदरम्यान सर्वांचे म्हणणे ऐकले जाईल व त्यावर शासनातर्फे योग्य तो निर्णय घेण्यात येईल. पर्यावरण विषयक जनसुनावणी समितीला कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार नाही. शासनाच्या नियमाप्रमाणे सर्व गोष्टी होतील. बेकायदेशीरपणे काही झाल्यास त्याबाबत शासन योग्य ती कारवाई करणार. |

१८) **श्री. विजय ठाकरे, संमित्र ग्रामविकास संस्था, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाबाबत सूचविलेल्या दुरूस्ती प्रकल्प प्रवर्तकाने करायला हव्या. माणिकगड किल्ला येथून जवळच असल्याचे एका नगर परिषद सदस्याने सांगितले आहे. त्याची देखील शहानिषा करण्यात यावी. या ठिकाणी वन्यप्राणी फार मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे | सुचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | ब्लास्टींग करताना जासत रसायनांचा वापर करायला नको. ब्लास्टींगमुळे जनावरांचे नूकसान होणार नाही याची खबरदारी घ्यायला हवी. दि. ०४/१२/२०२३ ला वन विभागाने अधिसूचना प्रकाशित केलेली आहे. त्यामध्ये ५२.५२२८ हे. जमीन अल्ट्राटेक सिमेंटकरिता निर्वाणीकरणाच्या माध्यमातून वळती करण्यात येत असल्याचे नमूद आहे. म्हणजेच वन विभागाने १९८० चा अधिकार काढून घेतलेला आहे. याचा अर्थ असा की जो शेतकरी शेती करत आहे तो या जमीनीचा मालक आहे मग त्याच्याकडे ७/१२ असो वा नसो. जोपर्यंत येथील शेतकऱ्यांना मोबदला मिळत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांनी जमीन हस्तांतरीत करू नये. स्थानिकांना रोजगार मिळाला पाहिजे. मी या मताचा आहे की कंपनीने स्थानिकांना कंपनीमध्ये भागीदार बनवावे. त्यांना व्यवसाय करण्यास प्रोत्साहन करावे जेणेकरून रोजगाराच्या समस्येवर काही प्रमाणात तोडगा काढता येईल. | |

**१९) <u>श्री. आशिष देरकर, तालुका प्रतिनिधी, दैनिक लोकमत, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | लोकांचा उद्योगाविषयी रोष निर्माण होण्याचे प्रमुख कारण जिल्हा प्रशासनाकडून खनिज विकास निधी न मिळणे आहे. कोरपना तालुक्यातील अल्ट्राटेक, अंबुजा व दालमिया यांच्या खाणीतून मिळणाऱ्या रॉयल्टीवर जिल्ह्याचे पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांचा अधिकार आहे. परंतु लोकप्रतिनिधी त्यांच्या गटाच्या ग्रामपंचायती किंवा त्यांच्या पक्षतील सरपंचांना सदर निधी वाटप करतात. सर्वप्रथम ज्या गावांमधून जास्त प्रमाणात खनिजाचे उत्खनन होते अशा ग्रामपंचायतींना खनिज विकास निधीचे वाटप करण्यात यावे. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनीच पुढाकार घ्यावा. पालकमंत्री व आमदार यांच्या अखत्यारीत असलेल्या निधीला सोडून उर्वरित निधी जिल्हाधिकाऱ्यांनी खर्च करावा व त्याचा अधिकार फक्त जिल्हाधिकाऱ्यांकडेच असावा. | सुचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | खनिज विकास निधीसाठी अल्ट्राटेक आवारपूर यांच्या विरोधात आंदोलन देखील करण्यात आले होते. सदर कंपनीने कामांची यादी मागितली परंतु यादीतील प्रस्तावित एक कामांना मंजूरी दिली नाही व सर्व कामे पालकमंत्र्यांनी व लोकप्रतिनिधींनी ठरविलेल्या ग्रामपंचायतींनाच देण्यात आले. ज्या ठिकाणी सर्वात जास्त परिणाम झाला अशा गावांना खनिज विकास निधी न देता मूल, पोंभूर्णा सारख्या गावांना देण्यात आला. कोरपना तालुक्यातील नांदा, आवारपूर, नारंडा व इतर गावांना डावलण्यात आले. पर्यावरण विषयक जनसुनावण्या नेहमी होत राहणार व मुद्दे परत येत राहणार त्यामुळे मा. जिल्हाधिकारी यांनी नि:पक्ष राहून खनिज विकास निधीचे नियोजनबद्ध पद्धतीने वाटप करावे. | |

२०) **<u>श्री. वामन तुराणकर, उप-सरपंच, नोकारी (खु), ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | शेजारच्या गडचिरोली जिल्ह्यात त्रिवेणी नावाचा उद्योग आला व त्यापाठोपाठ २८ उद्योग गडचिरोली जिल्ह्याकडे आकर्षित झाले आहेत. त्यामुळे वेगवेगळ्या रोजगाराच्या संधी गडचिरोलीतील नागरीकांना मिळत आहेत व गडचिरोली जिल्ह्याची औद्योगिक जिल्हा म्हणून ओळख निर्माण होत आहे. मी ज्या क्षेत्रामध्ये राहतो तेथे जवळपास २५० ते ३०० हेक्टर क्षेत्रामध्ये खाणकाम सुरू आहे. येथे मुद्दा उपस्थित करण्यात आला की उत्खननामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होईल. माझ्या गावालगत गोवारीगुडा हे गाव आहे. या गावामध्ये नोव्हेंबर महिन्यातच पिण्याच्या पाण्याच्या टंचाईची समस्या उद्भवत होती. परंतु अल्ट्राटेक कंपनीच्या खाणीमध्ये जमा झालेल्या पाण्यामुळे सदर परिसरातील पाण्याच्या टंचाईची समस्या संपुष्टात आली आहे. तसेच सदर खाण परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली आहे त्यामुळे परिसरामध्ये वायु प्रदूषणाची समस्या | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | वायु प्रदूषणाची समस्या उद्भवत नाही. खाणीतून उत्सर्जित होणाऱ्या धुळीमुळे सिलीकोसिस नावाचा फुफ्फुसाचा आजार होतो. धुळीचे उत्सर्जन रोखण्याकरिता खाण प्रशासनाने वेळोवेळी रस्त्यावर पाणी फवारणी करावी. तसेच माणिकगड सिमेंट कंपनीतर्फे आमच्या परिसरालगत असलेल्या गावांमधील नागरीकांची वेळोवेळी मदत केलेली आहे कंपनीला विनंती आहे की ज्या प्रकारे आपण नोकारी व परिसरातील गावांना सहकार्य केले त्याचप्रमाणे मरकागोंदी गावाला सहकार्य करावे. तसेच प्रशासनाला विनंती करतो की जिवती तालुक्यात भविष्यात देखील औद्योगिकीकरणास चालना देण्यात यावी जेणेकरून येथील स्थानिक नागरीकांचे जीवनमान ऊंचावण्यास व परिसराचा विकास करण्यास मदत होईल. | |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे स्र्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ०३ सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(उमाशंकर भ. भादुले)**
समन्वयक, पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिती तथा
उप-प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(तानाजी यादव)**
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(संजय पवार)**
अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त
जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर